स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्याशाखा अंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी. पदवी करिता सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा अंतिम आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

कला विद्याशाखेंतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाच्या शोध प्रबंधाची अंतिम सारांश पत्रिका

शोधप्रबंधाचा विषय

"प्रदीप म्हैसेकर यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या : एक चिकित्सक अभ्यास"

संशोधक

राठोड सिंधू नामदेवराव

मार्गदर्शक

प्रा. डॉ. पंढरीनाथ नारायणराव धोंडगे

मराठी विभाग

ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर, जि. परभणी

फेब्रुवारी - २०२०

"प्रदीप म्हैसेकर यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या : एक चिकित्सक अभ्यास"

प्रस्तावना :

साहित्याची निर्मिती ही समाजातील सर्जनशील कृती आहे. या साहित्याला संस्कृती व कलात्मक मूल्य असते. समाज, संस्कृती आणि साहित्य यांचा अनन्यसाधारण संबंध आहे. लेखन संस्कृतीला धरून समाज आरसा समोर ठेवून साहित्याची निर्मिती करत असतो. म्हणजेच लेखक हा निर्मितीक्षम कलावंत असतो, कारण तोही समाजाचा एक घटक असतो. त्याच्यावर समाजाचा प्रभाव असतो आणि त्याला आलेल्या अनुभवावरूनच तो साहित्याची निर्मिती करत असतो. अशा या साहित्याची उत्पत्ती ही प्राचीन काळापासूनची आहे. कारण मानवी उत्पत्तीपासून भाषा ज्याप्रमाणे प्रगत होत गेली, त्याचप्रमाणे साहित्यही आकारास येत गेले त्यात विविध वाङ्मय प्रकार आले यापैकी कादंबरी वाङ्मय प्रकार विशेष लोकप्रिय ठरला.

कादंबरी वाङ्मयाचा प्रवास दीडशे वर्षांचा आहे. अनेक स्थित्यंतरे घडत कादंबरीचे काही प्रकारही आले. त्यापैकी ऐतिहासिक कादंबरी हा प्रकार विशेष आहे. कारण इतिहास आणि वाङ्मय यांची सांगड घालणारा हा प्रकार आहे. इतिहास आणि ऐतिहासिक कादंबरी यामध्ये मूलभूत फरक असला तरी ऐतिहासिक कादंबरीची निर्मिती मूळात इतिहासकालीन व्यक्तीच्या प्रभावातून, आदरातून, कुतूहलातून व त्या व्यक्तीविषयी वाटणाऱ्या असामान्यत्वाच्या कल्पनेतून आणि जिव्हाळ्यातून निर्माण होते. या ऐतिहासिक कादंबरीचे दालन समृद्ध बनविण्याचे काम मराठी साहित्यिकांनी केले आहे. प्रामुख्याने ह. ना. आपटे, रा. भी. गुंजीकर, ना. स. इनामदार, गो. नी. दांडेकर, शिवाजी सावंत, विश्वास पाटील, प्रदीप म्हैसेकर यांच्या सारख्या इतिहास प्रिय साहित्यिकांचा यात समावेश होतो.

प्रस्तूत प्रबंधासाठी विषय निवडण्यामागची भूमिका प्रामाणिक आहे. मराठी साहित्याचे वाचन करणे, सोबतच इतिहास विषयाची आवड असल्याने या दोन्हीची सांगड घालणे हे फक्त ऐतिहासिक कादंबरीद्वारे शक्य होते. शिवाय एकूण ऐतिहासिक कादंबरीकार यांचा विचार करता प्रदीप म्हैसेकर यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या ह्या वेगळ्या आणि प्रभावी वाटल्या. जास्तीत जास्त इतिहास त्यांच्या कादंबऱ्यांतून आपल्याला दिसून येते. ऐतिहासिक व्यक्ती जशी इतिहासात आहे, तसेच वर्णन त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. किंबहुना अभ्यासू दृष्टी ठेवूनच त्यांनी आपले लेखन केलेले आहे. आपल्या ऐतिहासिक कादंबऱ्यांमध्ये त्यांनी काल्पनिकतेवर भर न देता जास्तीत जास्त इतिहास सर्वसामान्य वाचकांना कसा समजेल ? यासाठी ते आपल्या साहित्याद्वारे प्रयत्न करतात. त्यांचा हा प्रामाणिक हेतू आकर्षक ठरणारा आहे. संशोधन अभ्यासाकरिता घेण्यात आलेल्या सर्व कादंबऱ्या ह्या वाचनीय व अभ्यासनीय स्वरूपाच्या असल्याने शोध प्रबंधासाठी योग्यच होत्या, असे मला वाटते.

मराठी साहित्य क्षेत्रामध्ये कादंबरी वाङ्मय प्रकार ब्रिटिश राजवटीतून आलेला आहे. भाषांतरित स्वरूपात येणाऱ्या कादंबरीला आज स्वतंत्र आयाम लाभलेला आहे. या कादंबरीच्या अनेक प्रकारांपैकी ऐतिहासिक कादंबरीस लोकप्रियतेच्या बाबतीत समृद्धता प्राप्त झाली आहे. भारतीय संस्कृती, ऐतिहासिक व्यक्तिचित्रणे, अनेक राजकीय घडामोडींचा इतिहास कादंबरीद्वारे वाचकास मनोरंजक पद्धतीने वाचण्यास मिळतो राष्ट्रप्रेम, भाषेवरील प्रेम आणि ऐतिहासिक व्यक्ती पुरुषांविषयी आदर-सन्मान देणे हे प्रत्येक देशवासीयांसाठी गौरवास्पद बाब ठरते. म्हणून ऐतिहासिक कादंबरी लिहिताना लेखक त्याकडे विशेष लक्ष देतात. प्रदीप म्हैसेकर यांच्या लेखनाचा कल हा ऐतिहासिक कादंबरी लेखनाचा आहे. ऐतिहासिक घटना-घडामोडी घडण्यामागील पार्श्वभूमी सोबतच त्या घटनेची वास्तविकता आपल्या कादंबऱ्यांद्वारे ते लेखन करतात. त्यांच्या कादंबऱ्यांतून समाज जीवनाची ओळख होते. त्यांची भाषाशैली ही प्रभावी आहे. प्रत्येक कादंबरीस

साजेशी अशी कालखंडनिहाय भाषा ते वापरतात. प्रामुख्याने बौद्ध काळ, मराठ्यांचा काळ, मुघल काळ त्यांच्या कादंबऱ्यांतून दिसून येतो. व्यक्तिप्रधान असलेल्या त्यांच्या कादंबऱ्या ह्या वाचकास आकर्षित करतात, शिवाय त्या इतिहास जाणून घेण्यासही प्रवृत्त करतात.

शोधप्रबंधाची उद्दिष्टे स्पष्ट करताना, मराठी कादंबरीचा बारकाईने अभ्यास करण्यात आला. त्यात मराठी कादंबरीची उत्पत्ती इथपासून ते आजपर्यंत मराठी कादंबरीची बदलती रूपे अभ्यासली गेली. कादंबरी म्हणजे काय ? कादंबरीत होणारी अनेक स्थित्यंतरे, कादंबरीची व्याख्या, संकल्पना, परंपरा, विशेष सांगितली गेली आहेत. कादंबरीनंतर ऐतिहासिक कादंबरीचाही अभ्यास केला गेला आहे. तसेच अनेक ऐतिहासिक कादंबरीकारांपैकी प्रदीप म्हैसेकर यांचे वेगळेपणही दाखविण्यात आले आहे. त्यांच्या प्रत्येक कादंबरीतील मुख्य पात्रांसोबतच गौण पात्रांचाही विचार करण्यात आला आहे. तत्कालीन समाजव्यवस्था, भाषाशैली, संस्कृती, सांस्कृतिकतेसोबतच धार्मिक रूढी, परंपरा याशिवाय व्यक्तिचित्रे यावरून पात्रांची मानसिकताही अभ्यासता आली.

प्रबंध पूर्ण करण्यासाठी मला वर्णनात्मक संशोधन पद्धती, विवेचनात्मक संशोधन पद्धती व मनोविश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग झाला. जेणेकरून म्हैसेकरांच्या सर्व कादंबऱ्यांचा चिकित्सकपणे अभ्यास करून त्यांची मुलाखत घेतल्यानंतर एकूण वाङ्मयाचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर कसा परिणाम होऊ शकतो, याची जाणीव प्रकर्षाने झाली.

प्रकरणांची रूपरेषा -

प्रस्तुत शोधप्रबंधात सात प्रकरणे आहेत शिवाय काही परिशिष्टेही आहेत. ते खालीलप्रमाणे -

प्रकरण पहिले : कादंबरी वाङ्मय प्रकाराची गटचर्चा -

या प्रकरणात वाङ्मय प्रकार गटचर्चा अभ्यासताना ललित साहित्यात येणाऱ्या प्रमुख वाङ्मय प्रकारांविषयी चर्चा करण्यात आली. त्यात प्रामुख्याने काव्य, नाटक, कविता

आणि कादंबरी या प्रमुख ललित वाङ्मय प्रकारांचा विचार केला गेला आहे. तसेच कादंबरी वाङ्मयाचा इतिहास अभ्यासला आहे. मराठी कादंबरी वाङ्मयाचा १८५७ पासून ते आजतागायत होणाऱ्या बदलांचा अभ्यास करण्यात आला आहे. मराठी कादंबरीची संकल्पना स्पष्ट करताना सातव्या शतकात दिसून येणाऱ्या बाणाच्या कादंबरीपासून ते आजपर्यंतच्या कादंबरीस परिपूर्णतेपर्यंत प्रवासाचा अभ्यास करण्यात आला आहे. हा अभ्यास विविध साहित्यिकांच्या मतांद्वारे केला आहे. त्यावरून कादंबरीचे स्वरूप नमूद करण्यात आले आहे. मराठी कादंबरीची परंपरा अभ्यासताना कादंबरीच्या बदलानुसार कादंबरीची विविध रूपे आपणास पाहावयास मिळतात. कादंबरी वाङ्मय घटकांचा विचार करता विश्व किंवा जग, पात्र, कथानक, कथन पद्धती, वातावरण, भाषाशैली, व्यक्तिचित्रणे यासारख्या महत्त्वाच्या घटकांचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच कादंबरीची वैशिष्ट्येही सांगितली आहेत.

प्रकरण दुसरे : ऐतिहासिक कादंबरी : परंपरा व स्वरूप -

या प्रकरणामध्ये ऐतिहासिक कादंबरीचा बारकाईने अभ्यास करण्यात आला आहे. सुरुवातीस ऐतिहासिक कादंबऱ्यांचा आढावा घेताना अनेक ऐतिहासिक कादंबऱ्यांचा, त्यांच्यातील पात्रांचा व तत्कालीन समाजावर त्या कादंबरीचा प्रभाव अभ्यासण्यात आला आहे. ऐतिहासिक कादंबरीचा जन्म, त्यात होणारे नवनवीन बदल शिवाय ऐतिहासिक कादंबरीची व्याख्या, प्रेरणा व प्रयोजनही अभ्यासण्यात आले आहे.

ऐतिहासिक कादंबरी व इतिहास यामधील मूलभूत फरकही अभ्यासण्यात आला आहे. या कादंबरीचे स्वरूप, मर्यादा, भाषा, निवेदन, संवाद, प्रमुख व्यक्तिचित्रणाचाही विचार करण्यात आला आहे. त्याचबरोबर व्यक्तिप्रधान असणाऱ्या या ऐतिहासिक कादंबऱ्यांची वैशिष्ट्ये ही अभ्यासली आहेत. तसेच इतर कादंबऱ्यांच्या तुलनेत ऐतिहासिक कादंबऱ्यांचे वेगळेपणही नोंदवले गेले आहेत.

प्रकरण तिसरे : प्रदीप म्हैसेकर यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांमधील व्यक्तिचित्रणे -

या प्रकरणामध्ये प्रदीप म्हैसेकर यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांमधील व्यक्तिचित्रणांचा अभ्यास केला गेला आहे. त्यांनी जवळपास सर्वच ऐतिहासिक कादंबऱ्या या व्यक्तिप्रधान लिहिलेल्या आहेत. सर्वसाधारण वाचकाला ऐतिहासिक व्यक्तीचे चरित्र याविषयी फारशी माहिती नसते. ती माहिती कादंबरी सारख्या कलात्मक प्रकाराद्वारे आणल्यास वाचक आवडीने वाचतात. म्हणूनच त्यांनी आपल्या कौशल्यपूर्ण लेखनशैलीने या व्यक्तिरेखा साकारल्या आहेत.

प्रत्येक कादंबरीतील कादंबरी निहाय व्यक्तिचित्रणाची ओळख करून दिली आहे. मुख्य पात्रासोबतच गौण पात्रांचीही थोडक्यात ओळख करून दिली आहे. जेणेकरून समाजातील प्रत्येक घटकातील व्यक्तिचित्र डोळ्यासमोर येऊ शकेल. कोणत्याही व्यक्तिबद्दल केवळ बाह्यांगावरून मत ग्राह्य न धरता आंतरिकतेकडेही पाहणे आवश्यक असते. ही दृष्टी त्यांच्या एकूण कादंबऱ्यांतील पात्रांचा विचार केल्यास लक्षात येते. याचाही अभ्यास येथे करण्यात आलेला आहे.

प्रकरण चौथे : प्रदीप म्हैसेकर यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांचे वेगळेपण -

प्रस्तूत प्रकरणात प्रदीप म्हैसेकर यांच्या ऐतिहासिक कांदबऱ्यांचे वेगळेपण अभ्यासण्यात आले आहे. 'अखेरचा सम्राट', 'शाहाजीराजे', 'अशोक', 'तथागत', 'धम्म सांगती बाबा' व 'जिजाऊ' सारख्या कादंबऱ्यांद्वारे हे वेगळेपण दाखवण्यात आले आहे. या कादंबऱ्या लिहिण्यामागची त्यांची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. सोबतच इतर ऐतिहासिक कादंबरीकार व त्यांच्या लेखनशैलीवर कोणता फरक आहे ? हेही अभ्यासण्यात आले आहे. कथानक, वातावरण, निवेदन, भाषाशैली, व्यक्तिचित्रणे, संघर्ष चित्र, उपकथानक, राजकीय डावपेच यासह धार्मिकतेच्या प्रभावाद्वारे वेगळेपण दर्शविण्यात आले आहे. त्याशिवाय म्हैसेकर यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांची वैशिष्ट्येही सांगितली आहेत.

प्रकरण पाचवे : प्रदीप म्हैसेकर यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांची भाषाशैली -

कलाकृतीची कलात्मकता ठरवीत असताना त्या कलाकृतीतील भाषा आणि शैलीला विशेष महत्त्व असते. म्हणजे साहित्य कृतीतील भाषाशैलीवरूनच त्या लेखकाचे व्यक्तिमत्व ओळखू येते. म्हैसेकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव त्यांच्या साहित्यावरही झालेला आपणास दिसून येतो.

या प्रकरणांमध्ये भाषाशैली विषयक संकल्पना स्पष्ट करण्यात आली आहे. तसेच कादंबरीनिहाय म्हणी, लोककथा, उखाणे, वाकप्रचार, सुभाषिते, शेरोशायरी शिवाय उर्दू, फारशी, अरबी, महानुभवकालीन मराठी भाषा, संस्कृत व इतर भाषेचाही अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेला आहे. शिवाय प्रत्येक कादंबरीतील बोलीभाषा व प्रमाण भाषा ही अभ्यासली गेलेली आहे. त्यांच्या कादंबरीतील अलंकारिक भाषेत एक प्रकारची नादमयता तर आहेच; शिवाय कल्पनेच्याही पलीकडील काल्पनिकता दिसून आलेली आहे.

प्रकरण सहावे : प्रदीप म्हैसेकर यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांचे वाङ्मयीन विशेष -

कोणतीही साहित्यकृती साकार होते ती त्या साहित्यिकांच्या प्रतिभेने. मानवी जीवनाचे अनेक पैलू या साहित्यकृतीतूनच अनुभवास येत असतात. या साहित्यकृतीला कलात्मक साहित्यकृतीचा दर्जा केव्हा प्राप्त होतो? हे अभ्यासताना काही घटकांचा विचार प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेला आहे. वाङ्मयीन मूल्ये शोधताना एक गोष्ट लक्षात येते, की व्यक्तिभिन्नतेप्रमाणे प्रत्येकाचा एकाच गोष्टीकडे पाहण्याचा दृष्टिकोनही भिन्न असतो. त्याप्रमाणे म्हैसेकर यांच्या वाङ्मयीन साहित्याचा विचार केल्यास हे प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या कादंबरीतून दिसून येणाऱ्या काल्पनिकतेचा वापर, कथन शैलीची अनेक वैशिष्ट्ये, सामाजिक घटकांचा विचार, त्यांच्या कादंबऱ्यांतून दिसून येणारे कौटुंबिक भावजीवन, जीवनमूल्ये, वास्तव शोधक लेखन तसेच त्यांच्या लेखनातील विविध पैलूंचा विचारही येथे केला गेला आहे.

प्रकरण सातवे : उपसंहार व निष्कर्ष -

या प्रकरणामध्ये प्रदीप म्हैसेकर यांच्या कादंबऱ्यांचा चिकित्सकपणे अभ्यास करताना त्या-त्या घटक-उपघटकानुसार विषयाची चिकित्सा करण्यात आली आहे. योजण्यात आलेल्या वरील सात प्रकरणांचा गोषवारा थोडक्यात देण्यात आलेला आहे. तसेच संशोधनांती निघालेल्या निष्कर्षाचीही मांडणी करण्यात आलेली आहे.

एकूणच असे म्हणता येईल की, समाज उद्धारासाठी प्रदीप म्हैसेकर यांच्या विचारांचा व कार्याचा उपयोग तर होणारच आहे; शिवाय समाज संस्कृती टिकून ठेवण्याचे महान कार्यही या ऐतिहासिक कादंबऱ्या करीत आहेत. एकूणच म्हैसेकर यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या या महत्त्वाच्या व लक्षणीय आहेत, हे निर्विवादपणे सत्य समोर आले आहे.

परिशिष्टे - जीवनपट, सदस्य व पदे, ग्रंथसंपदा, ऐतिहासिक कादंबऱ्या, इतर कादंबऱ्या, मुलाखत, संदर्भ सूची.

संदर्भ सूची -

१. पाध्ये दिंगबर, 'साहित्य समाज आणि संस्कृती', लोकवाङ्मय गृह प्रकाशन, मुंबई, तृतीय आवृत्ती, ऑक्टों २००५, पृ.क्र. २३.

२. कुरुंदकर नरहर, 'धार आणि काठ', देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स, प्रा.लि. पुणे, आवृत्ती चौथी, १९९८, पृ. २२.

३. देशपांडे अ. ना., 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास', खंड-पहिला, व्हिनस प्रकाशन, पुणे, पृ. क्र. ६०.

४. ठाकूर रवींद्र, 'मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा', दिलीपराव प्रकाशन, प्रा. लि. पुणे. पृ. क्र. ३५५.

५. हस्तक उषा, 'कादंबरी आणि मराठी कादंबरी', साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, १९९३, पृ. क्र. ५६.

६. देशपांडे कुसुमावती, 'मराठी कादंबरीचे पहिले शतक', मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन, आ. दुसरी. पृ. क्र. ४६-४७.

७. शहा विद्या, 'मराठी ऐतिहासिक कादंबरी : एक अभ्यास', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आ. प्रथम, पृ. क्र. ६७.

८. गणोरकर प्रभा, 'वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश', ग. रा. भटकळ, फाऊंडेशन, मुंबई, आ. पहिली, पृ. क्र. १८२.

९. देशपांडे बालशंकर, 'कादंबरी विवेचन आणि विश्लेषण', स्नेहवर्धन प्रकाशन, पूणे प्र.आ. १९९८, पृ. क्र. ४१.

१०. कुलकर्णी द. भी. 'कादंबरी : स्वरुप व समीक्षा', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००३, पृ. क्र. २१५.

११. कुलकर्णी श्री. मा., 'कादंबरीची रचना लेख, इतिहास आणि कादंबरी', पृ. क्र. ०८.

१२. बांदिवडेकर चंद्रकांत, 'मराठी कादंबरी : एक चिंतन आणि समिक्षा', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्र. आ. १९८३, पृ. क्र. ८५.

१३. फडके ना. सि. 'प्रतिमा साधन', पुणे, नववी आवृत्ती, १९६५, पृ. क्र. २२९.

१४. मांडे प्रभाकर, 'मौखिक वाङ्मयाची परंपरा', गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, पृ. क्र. ५९५.

१५. राजाध्यक्ष विजया (संपा.), 'मराठी वाङ्मयकोश', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२, पृ. क्र. २२५.

संशोधक

राठोड सिंधू नामदेवराव

मार्गदर्शक

प्रा. डॉ. पंढरीनाथ नारायणराव धोंडगे
मराठी विभाग
ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर, जि. परभणी